# आभार अज्ञातांचे

मी खाते ते अन्न कोण पिकवते मला माहित नाही

मी घालते ते वस्त्र कोणी विणले मला माहित नाही

मी राहते ते घर कोणी बांधले मला माहित नाही

मी लिहिते तो पेन कोणी बनवला मला माहित नाही

मी लिहिते तो कागद कोणी बनवला मला माहित नाही

मी बोलते तो फोन कोणी बनवला मला माहित नाही

मी बघते तो टीव्ही कोणी बनवला मला माहित नाही

मी ऐकते तो रेडीओ कोणी बनवला मला माहित नाही

तरी पण आनंदाने मी सर्व काही नित्य वापरत आहे...

जीवनातील प्रत्येक श्वास नि पाऊल पुढे सरकत नाही

सदा सकल गरजा पूर्ण होती, अज्ञाताच्या कर्म-फळानी

मग का बर प्रार्थना करावी फक्त आप्त परिचीतांसाठी

ही माझी प्रार्थना देवा आहे त्या विश्वातील सर्वांसाठी

जे सदा निर्मळ पणे राबतात फक्त तुझ्या संसारासाठी

देवा सर्वांना सदा सुखी समाधानी सुदृढ आनंदी ठेव

🌹🙏🌹